# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०१६/ ००९६४ दिनांक- ०२.०५.२०१६

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०१६

अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. सुरेश वसंतराव मांदळे<br>८३५, सदाशिव पेठ,<br>पुणे ४११०३०. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | २९.०१.२०१६ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | २५.०२.२०१६ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०१.०४.२०१६ |

<u>मागितलेली माहिती:-</u>

१. *एम.एस.इ.डी.सी.एल. वाणीज्य परिपत्रक क्र. ११० व १२३ नुसार सर्व सामान्य मीटर एकत्री करण्याबाबत तसेच मीटर एकत्रीकरण करताना कंपनी ग्राहकाकडून मीटर एकत्रीकरण करण्या अगोदरच्या कालावधीचे पैसे वसूल करते. सदर दोन्ही परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या मान्यतेच्या आदेशाची छायांकित प्रत साक्षांकित मिळण्यासाठी आपल्या कार्यालयाकडे विनंती अर्ज (पत्र क्र. एम.ई. आर.सी/०१/२०१५ दि. २२.०९.२०१५) आम्ही रजि. पोस्टाने केला आहे. सदर माहिती आम्ही सार्वजनिक जनहितार्थसाठी आपणाकडे मागीतली आहे. एम.एस.इ.डी.सी.एल. या दोन्ही परिपत्रकाच्या आधारे ग्राहकांकडून बेकायदेशीर पैसे वसूल करत आहे. या आमच्या पत्राला आपल्या कार्यालयाकडून आजपावेतो कोणताही लेखी खुलासा प्राप्त झाला नाही. आमच्या या विनंती अर्जाला आपल्या कार्यालयामार्फत लेखी खुलासा न देण्याबाबतचा महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची / परिपत्रकाची छायांकित प्रत साक्षांकित मिळावी.*

२. *मुख्य अभियंता (वाणिज्य) एम.एस.इ.डी.सी.एल. वाणिज्य परिपत्रक क्र. ११० दि. १६.०२.२०१० व १२३ दि. १४.१०.२०१० या दोन्हीस आपल्या मान्यतेच्या आदेशाची प्रत साक्षांकित मिळावी.*

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

१. आपण उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची / परिपत्रकाची छायांकित प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही. आपला अर्ज, महावितरण कंपनीला या कार्यालयाच्या दि. ११.१२.२०१५ रोजीच्या पत्रासोबत आवश्यक कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेला आहे (सोबत प्रत जोडली आहे).

२. सदर मुद्दा असंबंधीत असल्याने माहिती उपलब्ध करणे शक्य नाही.

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

<u>मुद्दा क्रमाक १ :</u> आम्ही या कार्यालयाकडे जनहितार्थ केलेल्या दि.२२.०९.२०१५ रोजीच्या विनंती अर्जाला १२० दिवसात कोणताही लेखी खुलासा या कार्यालयाकडून आम्हास प्राप्त झाला नाही. सर्व सामान्य नागरीकाने केलेल्या विनंती अर्जाला कोणताही लेखी खुलासा न

कळविणे / विनंती अर्जाची दखल न घेणे, या बाबतचे महाराष्ट्र शासनाचे आदेश पत्र / परिपत्रक छायांकित प्रत मागीतली असता, सदर प्रत या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असा लेखी खुलासा करण्यात आला. माहिती उपलब्ध नाही असा लेखी खुलासा करून आमची दिशाभुल केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वेय माहितीचा अधिकार डावलण्यात आला आहे.

<u>मुद्दा क्रमाक २ :</u> महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या १९.२ नुसार वीज वितरण परवानाधरकरने काढलेल्या परिपत्रकास आपल्या कार्यालयाकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. महावितरणच्या वाणीज्य विभागाने काढलेल्या परिपत्रक क्र ११० दि. १६.०२.२०१० व क्र १२३ दि. १४.१०.२०१० या दोन्हीस आपल्या कार्यालयाच्या मान्यतेची प्रत मिळण्यासाठी महावितरणच्या संबंधित कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारात वेळोवेळी पाठपुरावा केला असता आम्हाला समाधनकारक खुलासा प्राप्त झाला नाही.

<u>आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) :-</u>

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २७.०४.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यांत आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी हे हजर होते व त्यांनी त्यांचे लेखी व मैखिक निवेदन सादर केले तसेच जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. २९.०१.२०१६ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.०२.२०१६ रोजी अपिलार्थी यांना उत्तर/माहिती उपलब्ध करुन दिले आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील हे दि.०१.०४.२०१६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेले आहे.

वरील अपीलावर दि. २७.०४.२०१६ रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली, असे माहिती अधिकारी यांनी सांगीतले. माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे निवेदन ग्राहय धरुन व अपिलातील उपस्थित मुददे व मागीतलेली माहिती या सर्व बाबींवर विचार करुन, वरिल अपील ही गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ नुसार त्याच्या दिनांक २२.०९.२०१५ च्या अर्जाला कोणताही लेखी खुलासा प्राप्त न झाल्याचे म्हटले आहे. तसेच नागरीकांनी केलेल्या अर्जाला कोणताही खुलासा न कळविणे, अर्जाची दखल न घेणे या बाबतचे महाराष्ट्र शासनाचे आदेश/पत्र/परिपत्रक यांच्या छायांकित प्रत या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असा खुलासा करणे असे नमुद केले असले तरी, माहिती अधिकारी यांनी त्याच्या २९.०९.२०१५ चा अर्ज या कार्यालयाच्या दिनांक ११.१२.२०१५ च्या पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करिता अग्रेषित केल्याचे व सोबत त्या पत्राची प्रत जोडलेली असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची/परिपत्रकाची छायांकित प्रत या कार्यालयात उपलब्ध नाही असे सुदधा कळविले आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्रमाक १ ची माहिती, माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्याचे /कळविल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या विनियम १९.२ नुसार वीज वितरण परवानाधारकारने काढलेल्या परिपत्रकास आपल्या (म.वि.नि.आ) कार्यालयाकडून मान्यता घेणे आवश्यक आहे. असे याबददल विनियमात नमूद नाही.

विनियम १९.२ खलील प्रमाणे आहे.

*"१९.२ वितरण परवानाधारक, ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासंबंधीच्या वीज पुरवठयाचा अटी व शर्ती आणि सर्व परिपत्रके, आदेश, आणि इतर दस्तऐवज किंवा पत्रे या विनियमांशी ती सुसंगत व्हावीत म्हणून त्यांत, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत, बदल करेल किंवा ती अद्यावत करेल.*

*परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेपासून चार महिन्यांच्या शेवटी, प्रत्येक वितरण पावानाधारक अशा रितीने बदल किंवा अद्यावतीकरण करण्यात आले असल्याचे, सोबत वीज पुरवठयाच्या सुधारित अटी व शर्तीची प्रत पाठवून, आयोगास कळवेल.*

*परंतु आणखी असे की, ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासंबंधीची सध्या अस्तित्वांत असलेली कोणतीहि परिपत्रके, आदेश, आणि इतर दस्ताऐवज किंवा पत्रे यांमध्ये, या विनियम १९.२ नुसार, जर बदल किंवा ती अद्यावत करण्यांत आली नाहीत तर ती, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या शेवटी, अवैध मानण्यांत येतील."*

त्याअनुषंगाने अपीलार्थी यांचे मुद्दा क्रमाक २ ला माहिती न पुरविणे किंवा समाधानकारक खुलासा न केल्याचे म्हणणे संयुक्तिक नाही. माहिती आधिकारी यांनी मुद्दाला अनुसरुन उत्तर दिल्याचे दिसून येत आहे.

करिता माहिती आधिकारी यांनी पारीत केलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे दिसून येते. करिता सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करु शकता.

निर्णय

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ.